**ठळक बातम्या**

- देशभरात जनगणना २०२७ च्या पहिल्या टप्प्यातल्या प्रक्रियेला उद्यापासून सुरुवात

- १५व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार पंचायती राज आणि स्थानिक स्वराज्य संस्थांकरता राज्याला दुसऱ्या टप्प्यात १०९ कोटी रुपये वितरित

- नवीन आर्थिक वर्षात राज्यात रेडी रेकनर दरांमध्ये कोणतीही वाढ न करण्याचा राज्य सरकारचा निर्णय

**आणि**

- अवकाळी पाऊस, गारपीट आणि वादळी वाऱ्यामुळे राज्यात शेतीचं नुकसान, येत्या दोन दिवसांतही राज्यात तुरळक ठिकाणी गारपिटीचा अंदाज

**<><><><><><>**

जनगणनेची प्रक्रिया उद्यापासून सुरू होणार असून, नागरिकांना स्व-नोंदणी पोर्टलद्वारे दोन्ही टप्प्यांत माहिती देण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. देशातली ही १६वी जनगणना असून पहिल्या टप्प्यात प्रत्येक घराची माहिती गोळा केली जाईल. त्यात घराचा क्रमांक, मजला, घराची स्थिती आणि घरात राहणाऱ्या व्यक्तींची संख्या अशा माहितीचा समावेश असेल. या प्रक्रियेत कुटुंबप्रमुखाचे नाव, लिंग, जात, मालकी हक्क, तसंच घरातील विवाहित जोडप्यांची संख्या आणि वाहनांची माहितीही नोंदवली जाणार आहे. जर एखादं जोडपं लिव्ह-इन संबंधाला कायमस्वरूपी आणि विश्वासार्ह नातं मानत असेल, तर त्यांची गणना विवाहित जोडप्यामध्ये केली जाईल असं या पोर्टलमध्ये म्हटलं आहे. पोर्टलवर वारंवार विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची यादी उपलब्ध आहे, त्यामुळे जनतेला विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांची उत्तरं देणं सोपं जाईल.

आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
३१ मार्च २०२६ - मंगळवार

**<><><><><>**

पंचायती राज संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी १५व्या वित्त आयोगाच्या शिफारसीनुसार अनुदानाला मंजुरी देऊन केंद्र सरकारनं निधी वितरित केला आहे. महाराष्ट्राला २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यामधून प्रत्येकी १०९ कोटी रुपये वितरित झाले आहेत. या अनुदानामुळे गावपातळीवर प्रशासन अधिक सक्षम होईल आणि गरजेनुसार विकासकामं राबवता येतील. ठरावीक उद्दिष्टांसाठी मर्यादित निधी आणि स्थानिक गरजेनुसार वापरता येणारा निधी असे दोन प्रकारचा हा निधी आहे.

**<><><><><>**

केंद्र शासनानं २०२७ पर्यंत हत्तीरोगाचं देशातून संपूर्ण उच्चाटन करण्याचं उद्दिष्ट ठेवलं असून या मोहिमेत राज्य सरकारनं सक्रिय सहभाग घेतला असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितलं. राज्यात ५५ लाख नागरिकांना औषधोपचाराचा लाभ देण्याचं उदिष्ट असल्याचं त्यांनी सांगितलं. राज्यातल्या कुपोषणावर प्रभावी नियंत्रण मिळवून महिला आणि बालकांच्या आरोग्य आणि पोषणात लक्षणीय सुधारणा घडवून आणण्यासाठी महिला आणि बाल विकास विभाग आणि चिल्ड्रन्स इन्व्हेस्टमेंट फंड फाउंडेशन यांच्यात पाच वर्षांचा सामंजस्य करार झाल्याची माहितीही त्यांनी दिली.

**<><><><><>**

नवीन आर्थिक वर्षात राज्यात रेडी रेकनर दरांमध्ये कोणतीही वाढ न करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यामुळे उद्यापासून लागू होणारे दर पूर्वीप्रमाणेच राहतील, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली आहे. दर जैसे थे असले तरी वार्षिक मूल्यदराच्या तक्त्यांमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी अनेक बदल केले आहेत. यामध्ये मंजूर प्रादेशिक आणि विकास

योजनांची अंमलबजावणी, नवीन सर्व्हे नंबरची नोंद आणि गहाळ गावं किंवा गावांच्या नावातल्या दुरुस्त्यांचा समावेश करण्यात आला आहे.

**<><><><><><>**

मुंबई महानगरपालिकेच्या आयुक्त पदाचा पदभार अश्विनी भिडे यांनी आज भूषण गगराणी यांच्याकडून स्वीकारला. भिडे यापूर्वी मुख्यमंत्री कार्यालयात अतिरिक्त मुख्य सचिव म्हणून कार्यरत होत्या. १९९५ च्या तुकडीतल्या आयएएस अधिकारी अश्विनी भिडे या मुंबई महापालिकेच्या पहिल्या महिला आयुक्त आहेत. तसंच भिडे यांनी मुंबई मेट्रो ३ म्हणजेच ॲक्वा लाईन सुरु करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती.

**<><><><><><>**

जैन धर्माचे २४ वे तीर्थंकर भगवान महावीर यांची जयंती आज सर्वत्र उत्साहात साजरी होत आहे.

भगवान महावीरांची शिकवण मानवतेला शांती, सलोखा आणि करुणेच्या दिशेने मार्गदर्शन करत असल्याचं राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी दिलेल्या संदेशात म्हटलं आहे. भगवान महावीर यांचा सत्य, अहिंसा आणि जागतिक शांततेचा संदेश मानवतेला मार्गदर्शक आहे असं सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महावीर जयंतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही महावीर जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><><>**

भगवान महावीर यांची जयंती आज मुंबईसह राज्यात विविध ठिकाणी साजरी झाली. याबाबत सविस्तर ऐकूया आमच्या प्रतिनिधीकडून…

**--व्हीसी---**

*(महावीर जयंतीनिमित्त **बुलढाणा** शहरात बाजारगल्ली इथल्या जैन मंदिरात विविध धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रम झाले. शहराच्या मुख्य रस्त्यांवरून भव्य शोभायात्रा निघाली.*

***नाशिक**मध्ये रक्तदान, अन्नदान अशा विविध उपक्रमांनी महावीर जयंती साजरी झाली. दहीपूल, नाशिकरोड इथं मिरवणूका निघाल्या.*

***जालना** जिल्ह्यात भोकरदन, अंबड, परतूर इथंही शोभायात्रा निघाल्या. शोभायात्रेवर जागोजागी पुष्पवर्षाव झाला.*

***अहिल्यानगर*** *जिल्ह्यातही गावागावात मिरवणुका निघाल्या. अहिल्यानगर शहरात महावीर स्वामी यांच्या मंदिरातून ते आनंदधामपर्यंत रॅली निघाली. त्यानंतर आनंद धाम इथं प्रवचन झालं.*

***रत्नागिरी*** *शहरात जन्मकल्याण उत्सव उत्साहात साजरा झाला. अन्नदानासह इतर सामाजिक कार्यक्रमही झाले.*

***सांगली****त लेझीम, झांजपथकांसह शोभायात्रा निघाली. या निमित्ताने रक्तदान शिबिरात दोनशेहून अधिक जणांनी रक्तदान केलं.*

***धुळे*** *जिल्ह्यात सकल जैन समाजाने मिरवणूक काढली.* ***हिंगोली****तही जैन समाजाने भव्य मिरवणूक काढली.* ***पुणे*** *शहर आणि परिसरातही विविध ठिकाणी शोभायात्रा निघत आहेत. )*

**<><><><><><>**

राज्यात विविध जिल्ह्यांमध्ये अवकाळी पावसाने काल आणि आज हजेरी लावली. यात मोठ्या प्रमाणात शेतीचं नुकसान झालं आहे.

**धुळे** जिल्ह्यामध्ये अवकाळी पाऊस आणि गारपीटने शेतीचं मोठं नुकसान केलं आहे. आज धुळे ग्रामीणचे आमदार राम भदाणे यांनी नुकसानग्रस्त भागांची पाहणी करून अधिकाऱ्यांना पंचनामे पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

**यवतमाळ** जिल्ह्यात गारपीट आणि वादळी वाऱ्यामुळे नुकसान झालेल्या क्षेत्रांचे पंचनामे करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी विकास मीना यांनी दिले आहेत.

**भंडारा** जिल्ह्यामध्ये अवकाळी पावसामुळं झाडाला लागलेले आंबे वादळी वाऱ्याने गळून पडल्याने शेतकऱ्यांचं नुकसान झालं आहे.

**जालना** जिल्ह्यात अंबड तालुक्यातल्या महाकाळा इथं दोन तरूणांचा वीज कोसळून मृत्यू झाला. तर पावसामुळे काढणीस आलेला गहू, हरभरा, मका या पिकांचं नुकसान झालं आंबा पिकालाही फटका बसला आहे.

**अहिल्यानगर** जिल्ह्यामध्ये पावसामुळे शेतकऱ्यांचं मोठं नुकसान झालं असून राहाता अणि पाथर्डी तालुक्यामध्ये वीज पडून दोन शेतकऱ्यांचा मृत्यू झाला. **परभणी** जिल्ह्यामध्ये वादळी वाऱ्यामुळे अनेक घरांवरील पत्रे उडाले असून वीज पुरवठा खंडित झाला होता. **जळगाव** जिल्ह्यामध्ये काल संध्याकाळी झालेल्या वादळी पावसामुळं रब्बी पिकांचे मोठे नुकसान झालं. नाशिक जिल्ह्यामध्ये द्राक्ष, डाळिंबाच्या बागेसह कांदा पिकाचं आणि **हिंगोली** जिल्ह्यामध्ये गहू, हळद पिकांचं मोठे नुकसान झालं आहे.

**अकोला** जिल्ह्यामध्ये विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्यासह काही भागांमध्ये गारपीट झाली. अकोट तालुक्यातल्या कावसा इथं शेतात वीज कोसळून आठ मेंढ्या दगावल्या. **यवतमाळ** जिल्ह्यामध्ये शेतकऱ्यांच्या रब्बी, भाजीपाला आणि फळपिकांचे मोठे नुकसान झालं आहे..**बुलढाणा** जिल्ह्यातही अवकाळी पाऊस आणि सोसाट्याच्या वाऱ्यामुळे मोठं नुकसान झालं असून संग्रामपूर आणि जळगाव जामोद तालुक्यात गहू, कांदा, मका,केळी,संत्री, ज्वारी आदि पिकांचं मोठं नुकसान झालं आहे.

**<><><><><>**

कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पुढचे दोन ते तीन दिवस मेघगर्जनेसह वादळी वारे वाहण्याची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी गारपिट होण्याची शक्यताही हवामान विभागाने वर्तवली आहे. सांगली, सोलापूर, परभणी, हिंगोली आणि नांदेड या जिल्ह्यांना आज वादळी पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. नाशिक, नाशिक घाट परिसर, अहिल्यानगर, पुणे, पुणे घाटमाथा, सातारा, लातूर, धाराशिव आणि यवतमाळ या भागांना उद्यासाठी वादळी पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

**<><><><><>**

बुलढाणा जिल्ह्यात आज रस्त्यावरच्या एका ट्रकला अचानक आग लागली. जळगाव जामोद शहराजवळच्या बायपास रोडवर हा ट्रक दुरुस्तीसाठी उभा होता. उन्हामुळे झपाट्याने वाढलेली आग वेळीच आटोक्यात आणण्यात यश आल्यानं आग पसरली नाही.

**<><><><><>**

जालन्यात भरधाव ट्रक वडाच्या झाडाला धडकून आज अपघात झाला. यात  ट्रक चालकासह अन्य एका प्रवाशाचा मृत्यू झाला आहे.

<><><><><><>

मीरा-भाईंदर, वसई-विरार क्षेत्रात रात्रपाळी लावून देण्यासाठी एका महिला सहकाऱ्याकडे १५ हजारांची लाच मागितल्याच्या आरोपावरून एका पोलीस निरीक्षकासह दोन वाहतूक पोलिसांविरुद्ध लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने गुन्हा दाखल केला आहे. हा गुन्हा २०२५मध्ये घडला होता.

<><><><><><>

पालघर जिल्ह्यातल्या अनेक गावपाड्यांमध्ये भीषण पाणीटंचाई भेडसावत आहे. मोखाडा, जव्हार, हे तालुके तसंच वाडा तालुक्यातल्या ओगदा टणावे टोकरेपाडा जांभळपाडा सागमाळ इत्यादी भागांमध्ये टँकरने पाणीपुरवठा होत आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडे ग्रामपंचायतींनी टँकर मंजुरीसाठी वेळेत प्रस्ताव पाठवला नसल्याने परिस्थिती गंभीर झाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

<><><><><><>

गोंदिया जिल्ह्यातल्या मोरगाव तालुक्यामध्ये ईटियाडोह धरणाच्या कालव्यात कपडे धुण्यासाठी गेलेली तरूणी पाय घसरल्यामुळं वाहून गेली. घटनेची माहिती मिळताच प्रशासनाने कालव्याचा पाणीपुरवठा बंद करून शोधमोहीम सुरू केली आहे.

<><><><><><>

IPL क्रिकेटमध्ये, पंजाब किंग्ज विरुद्ध गुजरात टायटन्स हा सामना आज चंडीगडमधे होणार आहे. थोड्याच वेळात या सामन्याला सुरवात होईल.

पंजाब किंग्जनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

//<><><><><><>//